RAJ OIL MILLS LTD.

September 03, 2026

To,

Department of Corporate Relationship **BSE Limited** Phiroze Jeejeebhoy Towers, Dalal Street, Mumbai 400001. ***Scrip Code: 533093***	**Corporate Relationship Department** **National Stock Exchange of India** Exchange Plaza, C-1, Block G, Bandra-Kurla Complex, Mumbai 400051. ***Symbol: ROML***

Sub.: Newspaper advertisement regarding intimation of 24th Annual General Meeting of the Company

Dear Sir/Madam,

We are forwarding herewith copies of newspaper cuttings, intimating that the 24th Annual General Meeting of the Company will be held on Monday, September 28, 2026 at 11:30 a.m. through Video Conferencing/ Other Audio Visual Means ("VC/ OAVM"), as published in the newspapers viz. 'Business Standard' (English) and 'Mumbai Mitra' (Marathi) on September 03, 2026.

The same is being made available on the website of the Company at www.rajoilmillsltd.com.

This is for your information and necessary records.

Thanking You,

Yours faithfully,

For **Raj Oil Mills Limited**

PRIYA PANDEY Digitally signed by PRIYA PANDEY Date: 2026.09.03 17:05:13 +05'30'

Priya Pandey
Company Secretary & Compliance Officer

Encl.: As Above

Valuation may cushion Happiest Minds stock

Deal-led concerns weigh on shares, but medium-term gains remain in sight

RAM PRASAD SAHU
Mumbai, 2 September

The merger announcement of ITC's subsidiary ITC Infotech and Happiest Minds Technologies to create the country's 11th-largest listed information technology company by revenue has elicited contrasting reactions from investors. The ITC stock is up about 4.7 per cent at ₹266.5 since the deal was announced on August 31, while investors in Happiest Minds have been poorer by 14 per cent, with the stock falling to ₹354 during this period.

While there are significant synergies and opportunities to scale up the business, the lack of an acquisition premium has weighed on the stock of the Ashok Soota-promoted company. Further, the two-step process to acquire the 22 per cent promoter stake in Happiest Minds will not trigger an open offer. This means investors will not get an "open-offer" type option to exit at a premium.

Brokerages have a mixed outlook on the Happiest Minds stock, with the "sell" camp citing uncertainty over the leadership transition, while positive views are centred on growth opportunities over the medium to long term. Further, the sharp correction and the price targets translate into reasonable upside from current levels.

The two-step transaction process involves ITC Infotech buying the 22.1 per cent stake held by founder-promoter and promoter entities for ₹1,330 crore at ₹395 per share. This will be followed by the amalgamation of Happiest Minds into ITC Infotech through a share swap. Shareholders of Happiest Minds will receive 25 shares of ITC Infotech for every 81 shares they hold in the company.

Mixed reaction



Source: Bloomberg, BSE

HDFC Securities Research believes the transaction is structured to avoid an open offer, as the stake purchase is just under the 25 per cent threshold that would trigger a mandatory open offer. For minority shareholders, the practical outcome is straightforward: there is no cash exit at any stage, point out analysts Vinesh Vala and Amit Chandra. Further, the deal will also allow ITC Infotech to get listed without an initial public offering.

The merger values Happiest Minds at ₹405 per share, largely in line with its listed price when the deal was announced. After the deal, ITC Infotech will hold 73.4 per cent of the combined entity, while existing Happiest Minds shareholders will own 26.6 per cent. The transaction requires regulatory and shareholder approvals, and the expected timeline for closure is 15 months.

There are multiple positives to the deal, as the merged entity will be able to operate at scale, have a geographically diverse presence and cross-sell its services while gaining access to large enterprise deals.

Analysts Kunal Bajaj and Shreya Mehra of Choice Institutional Equities remain constructive on the transaction, as the combination provides Happiest Minds with the scale and breadth required to unlock its next leg of growth while retaining its core artificial intelligence and digital engineering strengths. The focus now shifts to execution, particularly the ability to convert greater scale and cross-selling opportunities into sustainable revenue growth while maintaining margins and differentiation, they add.

The combined entity ended 2025-26 with revenue of ₹7,033 crore. It is guiding for revenue growth of 12.5 per cent on a constant-currency basis and expects to hit the $1 billion (₹9,490 crore) mark by 2027-28 (FY28).

HDFC Securities has downgraded the stock to "add", citing the absence of a takeover premium, uncertainty around the 15-month integration timeline, and a lack of clarity on the retention plans for the existing management team. The brokerage has assigned a target price of ₹400.

Choice Institutional Equities, however, has a "buy" rating with a target price of ₹440. Given the recent correction, Happiest Minds trades at 18.8x FY28 earnings, which offers a favourable entry point given the potential benefits from the combination, says the brokerage.

YOUR MONEY

Vector-borne disease covers: Who needs them, who doesn't

SANJAY KUMAR SINGH

During the rainy season, the incidence of vector-borne diseases increases. Many insurers in India offer benefit-based covers for dengue, malaria and chikungunya. These pay a fixed lump sum when claim conditions are met. Buyers should check their scope and triggers and whether they need such policies alongside their regular health insurance.

Know what is covered

Dengue, malaria and chikungunya are commonly covered. Some policies also include encephalitis, filariasis, kala-azar, Japanese encephalitis and Zika virus. "Most standalone vector-borne disease policies offer a sum insured of ₹10,000 to ₹2 lakh, with ₹75,000 or ₹1 lakh being common," says Arun Ramamurthy, cofounder, Staywell.Health.

Understand payout triggers

A benefit policy pays a predetermined lump sum. "The benefit is generally payable upon a confirmed diagnosis of a covered vector-borne disease, supported by the prescribed diagnostic evidence," says Priya Deshmukh, head – health products, operations & services, ICICI Lombard.

Triggers vary by policy. Hospitalisation needs to be attributable to the vector-borne disease. Some policies may have a minimum stay condition. ICICI Lombard requires two successive days of medically necessary hospitalisation.

Can supplement health cover

One advantage of these policies is the fixed payout, irrespective of actual treatment cost. "The fixed payout can help meet treatment-related expenses as well as non-medical and indirect costs that can arise during hospitalisation and recovery, including incidental expenses and potential loss of income," says Deshmukh. These policies can also pay for outpatient department (OPD) costs.

"A benefit can be claimed alongside a reimbursement under a regular health insurance policy if the insured has two separate policies," says Amarnath Saxena, chief technical officer-commercial, Bajaj General Insurance. Both policies' claim conditions must be met.

Cover may end after a claim

Check how many claims the policy permits. Under an individual plan, cover ends once the benefit is paid. In a family floater, the claimant receives 100 per cent of the sum insured. Continuation for other members and additional claims depends on the product. Some policies terminate after a second claim.

"To maintain protection against future vector-borne illnesses, the insured should then buy a new plan," says Saxena. Fresh cover starts after the applicable waiting period.

Limitations of these policies

These policies cover a narrow range of diseases. "It is difficult to predict which vector may cause a future medical problem," says Kapil Mehta, cofounder, Secure-Now Insurance Broker.

"Buying separate covers for individual illnesses can result in relatively high premiums," says Rohan Goel, business head, health insurance, Policybazaar.

Claim rejection: How to avoid it

- Claim rejection often happens because the disease is not covered by the policy (they offer narrow coverage)
- Another reason is the insured is unable to prove the illness was caused by a covered disease
- Before filing the claim, check your policy to ensure the disease you are claiming for is covered by it
- Blood tests, doctor's papers, and other medical documents should support your claim that you have a covered ailment

Decide whether you need it

Such targeted policies may suit people exposed to seasonal outbreaks, frequent travellers, and gig and self-employed workers. "Younger customers with limited health insurance may consider it where affordability matters," says Deshmukh.

A separate benefit cover helps when an illness keeps a person at home for a long period. "The person may incur expenses without being hospitalised. These expenses will not qualify under a regular hospitalisation cover," says Mehta.

Regular health insurance largely covers hospitalisation for vector-borne diseases, but many cases can be treated via OPD care. "Buyers with only a regular health insurance policy should supplement it with an OPD rider," says Goel.

Choose benefit amount carefully

Consider hospitalisation, out-of-pocket and OPD costs, uninsured and non-medical expenses, and income loss during recovery. For someone earning around ₹75,000 to ₹1 lakh and ill for 10 to 15 days, a ₹50,000-1 lakh benefit may be adequate. "For a ₹75,000-1 lakh cover, an indicative range for premium would be ₹1,000-1,500 per annum for an individual and ₹1,500-₹3,000 per annum for a family floater," says Ramamurthy.

Check waiting period

Buyers should be aware of the waiting period and exclusions in these plans. "Benefit-based plans typically have a short waiting period of around 15 days. The waiting period is usually uniform across the vector-borne diseases listed in the policy," says Saxena.

Hidden costs to check before you choose an interest-free loan

An interest-free loan can make a large purchase easier to manage by spreading the payments over several months. But customers should not assume that a zero-interest offer means there are no other costs or obligations.

A five-point checklist:

Total cost: Processing fees, convenience charges and taxes can increase the amount payable. Compare the final cost with the price of paying upfront.

Repayment schedule: Check the number and amount of instalments and their due dates. Ensure they fit comfortably alongside rent, bills, savings and existing loans.

Missed payments: Find out the late-payment or penal charges. Missed repayments could also affect your credit history.

Lender and credit limit: Identify the lender providing the credit. If the plan is linked to a credit card, part of the available limit may remain blocked until repayment.

Refunds and cancellations: Understand what happens if you return or cancel the purchase. A return may take time. Meanwhile, an instalment may become due.

The key is to assess the total cost, repayment obligations and impact on your finances, rather than choosing a plan simply because it advertises zero interest.

Read full report here: mybs.in/2g9Atks

COMPILED BY AMIT KUMAR

मुंबई मित्र
...रोज सकाळी हातात-दिवसभर मनात!
मुंबई
9870695106 9400110276
@dailymumbaimitra
www.mumbaimitra.com
गुरुवार | ३ सप्टेंबर २०२६
समुह संपादक : अभिजीत राणे

ठाकरेंच्या नगरसेविका विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द

मुंबई उच्च न्यायालयानेही दिला झटका

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेविका विशाखा राऊत यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. ठाकरे गटाच्या राऊत यांची नगरसेवक पद रद्द करण्याविरोधात दाखल केलेली याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.

पालघरच्या जात पडताळणी समितीने विशाखा राऊथ यांचे ओबीसी जात प्रम णपत्र अवैध ठरवले होते. त्यानंतर त्यांचे नगरसेवकपद धोक्यात आले होते. या निर्णयाविरूद्ध विशाखा राऊत यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र तिथं देखील त्यांना दिलासा मिळालेला नाही. कोर्टाने त्यांची याचिका फेटाळून लावली आहे.

जात पडताळणी समितीच्या अहवालानंतर मुंबई महानगर पालिकेने राज्य सरकारला पत्र लिहित नगरसेवक पद रद्द झाल्याच जाहीर करायला सांगितलं होत. मात्र पालिकेच्या या पत्रव्यवहातला विशाखा राऊत यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिल होतं.

विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्दची घोषणा सभागृहात लवकरच होणार आहे. पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी नगरविकास विभागाला पत्राद्वारे याची माहिती दिली आहे. विशाखा राऊत यांना पुढील ६ वर्षे नगरसेवक पदाची निवडणूक लढवता येणार नाहीये. असा आयुक्तांच्या या पत्रात उल्लेख आहे.

दरम्यान, आता विशाखा राऊत यांच्या जागी कोणाची नगरसेवकपदासाठी वर्णी लागणार याची उत्सुकता सर्वांना लागून राहिली आहे. सदा सरवणकर हे प्रिया सरवणकर यांच्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसले होते. त्यांनी एकनाथ शिंदे यांची देखील भेट घेतली होती.



बार्बेक्यू नेशनमध्ये डेझर्टच्या प्लेटवर झुरळ; ग्राहकाकडून स्वच्छतेबाबत चिंता; व्हिडिओ व्हायरल

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबईतील विरार येथे बार्बेक्यू नेशनमध्ये स्वच्छतेसंदर्भात गंभीर समस्या समोर आली आहे. येथे वाढदिवस साजरा करण्यासाठी आलेल्या एका ग्राहकाने त्याच्या प्लेटवर एक झुरळ फिरत असल्याचे आढळले. या प्रकाराचा व्हिडिओ व्हायरल झाला असून यामध्ये रेस्टॉरंटमधील किचनची देखील वाईट अवस्था असल्याचे दिसून येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एक ग्राहक १९ ऑगस्ट रोजी, पाच जण त्यांच्या मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी विरारमधील बार्बेक्यू नेशन या रेस्टॉरंटमध्ये गेला. यावेळी त्यांच्या डेझर्टच्या प्लेटवर एक झुरळ फिरत असल्याचे दिसून आले. या घटनेचा व्हिडिओ एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हायरल झाला, ज्यामुळे अन्न सुरक्षा आणि रेस्टॉरंटच्या स्वच्छतेबद्दल चर्चा सुरू झाली आहे. यश राऊत या एक्स वापरकर्त्याने एक व्हिडिओ शेअर केला, ज्यामध्ये डेझर्टच्या प्लेटवर झुरळ फिरताना दिसत आहे. या व्हिडिओमध्ये, झुरळ असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर रेस्टॉरंटचे कर्मचारी ती प्लेट घेऊन जाताना दिसत आहेत. तसेच व्हिडिओमध्ये अस्वच्छ स्वयंपाकघरही दिसून येत आहे. ज्यामुळे या ठिकाणच्या स्वच्छतेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, व्हिडिओ पोस्ट करत एक्स वापरकर्त्याने स्वच्छतेचा दर्जा निकृष्ट असूनही रेस्टॉरंटने ''प्रिमियम दर'' (महागडे दर) आकारले जात असल्याचे म्हटले आहे.

एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाशी संबंध नाही, विरोधकांची राजीनाम्याची मागणी अध्यक्षांनी फेटाळली

■ प्रतिनिधी, मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणावरून होत असलेल्या वैयक्तिक आरोपावर आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमानवार यांनी नाराजी व्यक्त केली आहे. पेपर जानेवारीत फुटले आणि आपण आयोगाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार मार्चमध्ये स्वीकारला असे स्पष्ट करीत त्यांनी विरोधकांनी केलेली राजीनाम्याची मागणी फ ेटाळून लावली.

लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या अन्न व औषध निरीक्षक परीक्षेचा पेपर फुटल्यावर सध्या आयोग वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे। या प्रकरणात विद्यार्थी संघटना आणि विरोधकांकडून थेट राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांना लक्ष्य करण्यात येत आहे. त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर भीमनवार यांनी पेपर फुटी प्रकरणातील वस्तुस्थिती जनतेसमोर स्पष्ट केली आहे.

औषध निरीक्षक परीक्षेशी संबंधित प्रश्नपत्रिका फ ुटीची घटना जानेवारी २०२६ मध्ये घडल्याचे निदर्शनास आले. मात्र, भीमनवार यांनी स्पष्ट केले की, त्यांनी १८ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली, तर ३ मार्च २०२६ रोजी प्रत्यक्ष कार्यभार स्वीकारला. त्यामुळे या घटनेच्या कालावधीबाबत वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

औषध निरीक्षक परीक्षा प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणाची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने गंभीर दखल घेतली असून, यासंदर्भात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक तसेच सुरक्षा उपाययोजना सुचविण्यासाठी आयोगाने अंतर्गत उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. तसेच, संपूर्ण परीक्षा प्रक्रियेत आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यासाठी शासनानेही स्वतंत्र उच्चस्तरीय समिती स्थापन केली असल्याचे भीमनवार यांनी सांगितले.

अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर आपले संपूर्ण लक्ष आयोगाच्या परीक्षा व भरती प्रक्रियेची विश्वासार्हता, पारदर्शकता, कार्यक्षमता आणि सुरक्षितता अधिक बळकट करण्यावर केंद्रित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आयोगावर सोपविण्यात आलेल्या वाढीव भरतीच्या जबाबदारीच्या पार्श्वभूमीवर परीक्षा व भरती प्रक्रिया अधिक सक्षम आणि सुरक्षित करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा हाती घेण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

''आयोगाची उच्च परंपरा, निष्पक्षता आणि विश्वासार्हता जपणे तसेच लाखो उमेदवारांना न्याय्य आणि समान संधी उपलब्ध करून देणे ही माझी घटनात्मक जबाबदारी आहे. ही जबाबदारी पूर्ण पारदर्शकता, निष्पक्षता आणि सचोटीने पार पाडण्यासाठी मी कटिबद्ध आहे,'' असे भीमनवार यांनी म्हटले आहे.

सार्वजनिक परीक्षांबाबत लोकप्रतिनिधी, उमेदवार आणि नागरिकांना प्रश्न उपस्थित करण्याचा तसेच चिंता व्यक्त करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

■ हायवेवरील दरोडेखोरांपासून सावध! समृद्धी महामार्गावरील दरोडेखोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर रोड सेफ्टी तज्ज्ञांनी दिलेला एक इशारा प्रत्येक प्रवाशाने गांभीर्याने घ्यायला हवा. दरोडेखोर म्हणजे अचानक रस्ता अडवून लुटणारी टोळी एवढेच चित्र आता डोक्यातून काढावे लागेल. अशा टोळ्यांचे सदस्य ढाबे, हॉटेल किंवा विश्रांतीस्थळांवर सामान्य ग्राहकांसारखे बसून रेकी करू शकतात. आपल्या फोनवरील गप्पांमधून जमीन व्यवहार, रोख रक्कम, दागिन्यांची खरेदी, प्रवासाचे ठिकाण किंवा आर्थिक व्यवहारांची माहिती नकळत बाहेर पडू शकते. त्यातून संभाव्य सावज हेरले जाऊ शकते आणि पुढे पाठलाग सुरू होऊ शकतो. त्यामुळे महामार्गावरील सुरक्षितता म्हणजे केवळ वेगमर्यादा आणि सीटबेल्ट नव्हे; आपण कुठे, कोणासमोर आणि काय बोलतो याचे भान ठेवणेही रोड सेफ्टीचाच भाग आहे. सार्वजनिक ठिकाणी आर्थिक आणि वैयक्तिक माहिती उघड करू नका. थोडीशी गोपनीयता आणि सतर्कता मोठे संकट टाळू शकते.

■ सेटलमेंट नव्हे, कायद्याचा धाक हवा! समाजात जाणीवपूर्वक तेढ निर्माण करणारे, हिंसाचाराचे षडयंत्र रचणारे किंवा थेट पोलिसांवर हात उचलणारे कोणत्याही धर्माचे, जातीचे अथवा पक्षाचे असोतत्यांच्यावर कठोर आणि दृश्यमान कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे. अन्यथा गुन्हेगाराला कायद्याची नव्हे तर राजकीय 'सेटलमेंट'ची सवय लागते. बुलडोझर न्याय हा कायदेशीर प्रक्रियेची जागा घेऊ शकत नाही; पण बेकायदा बांधकाम असेल तर कारवाईही निवडक नसावी. उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांच्या समर्थकांना भावणारी बाब हीच आहेराज्य गुन्हेगारासमोर दुबळे दिसता कामा नये. महाराष्ट्रात पोलिसांवर हल्ला झाल्यानंतरही सूत्रधारांवर कारवाईऐवजी बंद दाराआड समझोत्याचीच चर्चा होत असल्याचा संदेश गेला, तर पोलिसांचे मनोधैर्यही खचते आणि सामान्य नागरिकांचा विश्वासही. कायदा सेक्युलर असावा; पण कायद्याची अंमलबजावणी निर्भय असली पाहिजे. गुन्हेगाराची ओळख पाहून नव्हे, गुन्हा पाहून कारवाई झाली पाहिजे.

■ पाहुण्याच्या काठीने साप मारायला काय हरकत आहे? विद्यानंद बापट नास्तिक आहेत, डावे आहेत की त्यांना धार्मिक उत्सवांविषयी आस्था नाही, हा मुद्दा क्षणभर बाजूला ठेवूया. त्यांनी उपस्थित केलेला ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न योग्य आहे का, एवढेच पाहूया. गणेशोत्सवाला दीडशे वर्षांची परंपरा आहे; पण कर्णकर्कश डीजे, बेसच्या भिंती हादरवणारा आवाज आणि मध्यरात्रीपर्यंत चालणारा धिंगाणा ही त्या परंपरेची अपरिहार्य अंगे कधीपासून झाली? बापटांच्या इतर मागण्यांशी असहमती असू शकते; मात्र त्यांच्या प्रयत्नांतून उत्सव ध्वनिप्रदूषणमुक्त होणार असेल तर त्याचा फायदा शेवटी पुणेकरांनाच होणार आहे. विरोधकांनी बापटांना विरोध करण्याआधी उत्सवात घुसलेल्या या विकृतींविरुद्ध आपण शेवटचे कधी बोललो, एवढा प्रश्न स्वतःला विचारावा. व्यक्तीची विचारधारा न पाहता योग्य मुद्द्याला पाठिंबा देणे ही वैचारिक गुलामी नव्हे, व्यावहारिक शहाणपण आहे. पाहुण्याच्या काठीने साप मरत असेल तर काठी कोणाची यापेक्षा साप मरणे महत्त्वाचे!

■ डीजेबंदी : आंदोलनातून आता कायदेशीर लढाईकडे! ध्वनिप्रदूषणाविरुद्ध सभा, मोर्चे आणि आंदोलने आवश्यक आहेत; पण शरद केळकर यांनी या लढ्याला आता महत्त्वाचे कायदेशीर वळण दिले आहे. प्रेशर मीड, प्लाझ्मा साऊंड आणि लेझरच्या वापरातील नियमभंगाबाबत त्यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे केलेल्या तक्रारीची दखल घेऊन आयोगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दोन आठवड्यांत Action Taken Report मागवली आहे. परवानगी कोण देते, निकष काय, किती मंडळांना परवानग्या दिल्या आणि नियमभंगाबद्दल किती कारवाया झाल्यायाचा हिशेब आता प्रशासनाला द्यावा लागणार आहे. या प्रयत्नाचे खरे महत्त्व इथेच आहे. ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न 'सणविरोध विरुद्ध धर्मरक्षण' अशा निरर्थक वादातून बाहेर काढून नागरिकांचे आरोग्य, प्रशासनाची जबाबदारी आणि कायद्याची अंमलबजावणी या चौकटीत आणणे आवश्यक होते. केळकरांचा प्रयत्न यशस्वी झाला तर पुण्यापुरताच नव्हे, भविष्यातील अशा संघर्षांसाठीही तो महत्त्वाचा संदर्भ ठरू शकतो.

■ खेडे समृद्ध झाले तर आरक्षणाचा प्रश्नही बदलेल! आरक्षणाच्या प्रश्नाचे कायमस्वरूपी उत्तर केवळ टक्केवारीच्या फेरवाटपात नाही; ते प्रत्येक सामान्य तरुणाला सन्मानाने जगता येईल इतकी रोजगाराची साधने उपलब्ध करण्यात आहे. आज सरकारी नोकरीला असलेले अवास्तव महत्त्व तिच्या सुरक्षिततेतून आणि पर्यायांच्या अभावातून आले आहे. शहरात वीस-पंचवीस हजारांसाठी धडपडणाऱ्या तरुणाला स्वतःच्या गावातच समाधानकारक उत्पन्न मिळाले, तर स्थलांतराची गरजच किती उरेल? म्हणून विकासाचा केंद्रबिंदू महानगरांऐवजी खेड्यांकडेही वळला पाहिजे. आधुनिक शेती, अन्नप्रक्रिया, कृषीपूरक उद्योग, ग्रामीण सेवा, डिजिटल व्यवसाय आणि मजबूत पायाभूत सुविधा यांच्या माध्यमातून गावातच मोठी अर्थव्यवस्था निर्माण होऊ शकते. त्यातून reverse migration घडू शकते आणि सरकारी नोकरीसाठीची जीवघेणी स्पर्धाही कमी होईल. आरक्षणाची गरज आदेशाने संपणार नाही; संधींची विपुलता निर्माण झाली की त्यावरील अवलंबित्व आपोआप कमी होईल. खरे सामाजिक परिवर्तन म्हणजे संधींचे आरक्षण नव्हे, संधींची निर्मिती हेच आहे!

मुंबई सहकारी बोर्डाच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध

स्पर्धेऐवजी सहकार्य आणि संस्थेच्या व्यापक हिताला प्राधान्य दिल्याचा सकारात्मक संदेश गेला: आ. प्रवीण दरेकर

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई सहकारी बोर्डाच्या संचालक मंडळाच्या सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठी झालेल्या निवडणुकीत 'सहकार पॅनेल' च्या सर्व उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. सहकार क्षेत्रातील एकजूट, परस्पर विश्वास आणि संस्थेच्या विकासासाठी सर्वांनी दाखविलेल्या सकारात्मक भूमिकेमुळे ही निवडणूक बिनविरोध पार पडली, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी दिली.

या निवडणुकीत प्रवीण दरेकर, शिवाजीराव नलावडे, सिद्धार्थ टी. कांबळे, प्रसाद लाड आणि नंदकुमार काटकर यांच्या नेतृत्वाखालील सहकार पॅनेलच्या उमेदवारांची संचालकपदी बिनविरोध निवड झाली.

नवनिर्वाचित संचालकांमध्ये प्रवीण यशवंत दरेकर, मिलिंद तातू कांबळे, अंकुश रामचंद्र जाधव, अमोल श्रीपती खरात, वर्षा अजित माळी, शिवाजीराव विष्णू नलावडे, नितीन धोंडीराम बनकर, सतीश दत्ताराम सावर्डेकर, विजय गोविंद जाधव, अनिल दत्तात्रय गजरे, शंकर काशिनाथ अय्यप्पा, बाळासाहेब दिनकर घाडगे, मिलिंद गोविंद राऊत, श्रीधर विश्वनाथ जगताप, किशोर दत्तात्रय पाटणकर, प्रवीण दयारू डिकले, सुरेश विठ्ठल भोळेराव, विठ्ठल ज्ञानेश्वर वाळुंज, जयंत लक्ष्मण शिरसिकर, मदन दादासाहेब यादव आणि अनिषा अ. माजगावकर यांचा समावेश आहे.

मुंबईतील सहकार चळवळ अधिक सक्षम करणे, सहकारी संस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, सहकारी संस्थांचे पदाधिकारी व सभासदांना प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देणे तसेच बदलत्या काळानुसार सहकार क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि व्यावसायिकता वाढविण्यासाठी नवनिर्वाचित संचालक मंडळ प्रयत्नशील राहील. बिनविरोध निवडीमुळे सहकार क्षेत्राने संघर्षाऐवजी समन्वय, स्पर्धेऐवजी सहकार्य आणि संस्थेच्या व्यापक हिताला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचा सकारात्मक संदेश गेला आहे. सर्व घटकांना विश्वासात घेऊन मुंबई सहकारी बोर्डाच्या माध्यमातून सहकार चळवळीला अधिक व्यापक आणि गतिमान स्वरूप देऊ, असा विश्वासही आ. प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केला.

सर्व उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल सहकार क्षेत्रातील विविध संस्था, पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतकांकडून नवनिर्वाचित संचालक मंडळाचे अभिनंदन करण्यात येत आहे.

या बिनविरोध निवडीबद्दल प्रभाग समिती अध्यक्ष व मुंबई हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि.चे अध्यक्ष विठ्ठलराव भोसले, मुंबई-कोकण विभागीय मजूर सहकारी संघाचे अध्यक्ष सुनील बांबुळकर यांनी सर्व नवनिर्वाचित संचालकांचे अभिनंदन केले असून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छाही दिल्या आहेत.

मुंबईतील दोन हॉटेलांसह 'ब्लिंकिट'चा परवाना निलंबित

■ प्रतिनिधी, मुंबई

अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत हलगर्जीपणा करणाऱ्या आस्थापनांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई केली आहे. मालाड पश्चिम येथील 'दिल्ली स्विट अँड भेळपुरी हाऊस', कुर्ला पश्चिम येथील 'गुलझार मोहम्मदी हॉटेल' आणि अकोला येथील 'ब्लिंक कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेड' या तीन आस्थापनांचे अन्न परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली.

मालाड येथील दिल्ली स्विट अँड भेळपुरी हाऊसच्या तपासणीत अन्न सुरक्षेच्या गंभीर त्रुटी आढळल्या. भांडी धुण्याच्या जागेतील फ्रीजम ध्ये उघडे कच्चे समोसे ठेवण्यात आले होते. हे अन्न उघड्या गटाराच्या दुर्गंधी व साचलेल्या पाण्याच्या संपर्कात येत असल्याचे निदर्शनास आले. स्वयंपाकघराची भिंत मोडकळीस आलेली होती, प्लॅस्टर गळत होते, तर अन्न तयार करण्याच्या जागेवर उघडे बल्ब लटकलेले होते.

तसेच, साफसफाई न केलेल्या पाण्याच्या टाकीतील पाणी फिल्टर न करता अन्न तयार करण्यासाठी व ग्राहकांना पिण्यासाठी वापरले जात होते. पाण्याच्या चाचणीचे अहवालही उपलब्ध नव्हते. केवळ 'प्रिपेअर्ड फूड' श्रेणीचा परवाना असताना लस्सी, मिठाई, पनीर, फ्रँकी व फरसाणचे उत्पादन आणि पुनर्पॅकिंग केले जात असल्याचे आढळले. लेबल नसलेले पनीर आणि मुदत संपण्याची तारीख नसलेली लस्सी जप्त करण्यात आली. ३६ पैकी २६ अन्न हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे अनिवार्य वैद्यकीय प्रमाणपत्रही नव्हते.

दरम्यान, कुर्ला पश्चिम येथील गुलझार मोहम्मदी हॉटेलच्या तपासणीत ८८ पैकी केवळ २४ गुण मिळाले. स्वयंपाकघर दाटीवाटीचे आणि अत्यंत अस्वच्छ आढळले. भिंती, छत व दरवाजे तेलकट व दमट होते, तर फरशी तुटलेली व पाण्याचा निचरा व्यवस्थित नसल्याचे आढळले. स्वयंपाकघरात झुरळांचा वावर, तुंबलेली गटारे, उघड्यावर ठेवलेले शिजवलेले अन्न आणि सडलेल्या भाज्यांचा वापर आढळला. कर्मचाऱ्यांकडे वैद्यकीय तपासणीचे रेकॉर्ड नव्हते.

अकोला येथील ब्लिंक कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या आस्थापनाला यापूर्वी सुधारणा नोटीस बजावण्यात आली होती. मात्र फ ेरतपासणीत अनेक त्रुटी कायम असल्याचे आढळले. वॉक-इन चिलर व फ्रीजरचे पडदे फाटलेले व खराब होते. रॅकवर अन्न व अखाद्य वस्तू एकत्र ठेवण्यात आल्या होत्या.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष तयार होणार; जात धर्मापासून ते सरकारमधील रिक्त जागांचा तपशील गोळा होणार

■ प्रतिनिधी, मुंबई

राज्य शासनाच्या सेवेतील सर्व कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष अद्ययावत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यातून राज्यातील शासकीय, निमशासकीय अशा सर्व कर्मचाऱ्यांची जात, धर्म पासून सरकारमधील रिक्त जागांचा लेखाजोखा गोळा केला जाणार आहे. अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय यांच्याकडून ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही १ जुलै २०२६ हा संदर्भ दिनांक धरून ही माहिती गोळा केली जाणार आहे. या माहितीकोषात केवळ नियमित आस्थापनेवरीलच नव्हे, तर सर्व प्रकारच्या कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. यामध्ये कार्यव्ययी आस्थापना, रोजंदारी, अंशकालीन, मानसेवी तसेच तदर्थ तत्त्वावर नियुक्त केलेले कर्मचारी यांचाही समावेश करण्यात येणार आहे.